रक्कमा कमी पडल्यास त्या रक्कमंशिवाय आणखी काही रक्कमा द्याव्या लागल्यास त्या रक्कमा देण्याची जबाबदारी तुमचेवर आहे. त्याप्रमाणे रक्कम मागणी होताच देणे ही या खरेदीखताची महत्वाची शर्त असून याप्रमाणे रक्कम दिली तरच खरेदीखत कायम राहील.

१७. तुम्हांस उपरोक्त बांधकाम खरेदी करण्यासाठी कुठल्याही संस्थेकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास ते कर्ज फक्त खरेदीखताने दिलेल्या जागे संबंधीच घेता येईल. अन्य जागेवर तुम्हांस कर्जाची कुठल्याही जबाबदारी ठेवता येणार नाही. याप्रमाणे कर्ज मिळणारी कुठल्याही जादा कागदपत्रांची जरुरी लागल्यास ते कागदपत्र तुमच्याकडून खर्च घेवून आम्ही तुम्हांस देवू.

१६. तयार झालेल्या इमारतीचे नांव **शंकर प्लाझा** असे ठेवावयाचे ठरले आहे. त्या बद्दल तुमची तक्रार नाही.

१७. प्रस्तुत करार बांधकामाचा ठेकेदार आणि मालक यांच्या दरम्यानचा नाही. प्रस्तुत करार हा बांधीव जागा खरेदी देण्यासंबंधीचा आहे आणि आम्ही तयार केलेली स्पेसिफिकेशन्स तुम्ही मान्य केली आहेत. आम्ही तुमचे कॉन्ट्रक्टर नाही. अथवा आमची नियुक्ती कॉन्ट्रक्टर म्हणून तुम्ही केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत व्यवहारास महाराष्ट्र सरकाराचा कायदा सेल्स टॅक्स ॲक्ट याप्रमाणे कर भरण्याची गरज नाही. मात्र यदाकदाचीत असा कर भरण्याची जबाबदारी आली तर ती तुमची आहे. सबब अशा प्रकारे कराबद्दल आमच्याकडे मागणी करण्यांत आली तर ती रक्कम तुम्ही भरुन देण्याची आहे आणि यदाकदाचीत ती रक्कम तुम्ही भरुन दिली नाही आणि आम्हांस भरावी लागली तर ती रक्कम नुकसान व्याजासह वसूल करण्याचा हक्क आम्हांस असून त्याप्रमाणे रक्कम आम्ही तुमच्या पासून वसूल करु. आम्ही अगोदर बांधकाम सुरु केले आहे. तेव्हा हे ही तुम्हांस माहिती आहे.

१७. तुम्ही असेही कबूल केले आहे की, –

१. सरकारी कायदे कानुनमुळे अथवा अन्य कारणास्तव आणखी काही खर्चाची रक्कम वाढल्यास ती रक्कम हिस्सेराशीने तुम्ही आम्हांस देण्याची आहे.

१८. प्रस्तुत खरेदीखतातील शर्ती व अटी तुम्ही व आम्ही कबूल करुन त्याच्या मान्यतेसाठी तुम्ही व आम्ही या खाली सह्या केल्या आहेत.

सदरचा बांधीव भाग खरेदीखत आज रोजी राजीखुशीने व स्वसंतोषाने लिहुन दिला असे.

**परिशिष्ठ – १**

**संपुर्ण प्लॉट मिळकतीचे वर्णन :–**

तुकडी जिल्हा जळगांव पोट तुकडी तालुका अमळनेर नगरपालिका हद्दीतील अमळनेर येथील स्थावर मिळकत यांसी सि स नंबर २४०७ व सि स नंबर २५१० चे क्षेत्र ५००.००चौ मी .

यासी चतु:सिमा येणे प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | :–रस्ता | पश्चिमेस | :–रस्ता |
| उत्तरेस | :–सि स नंबर २४०६/३ | दक्षिणेस | :– सि स नंबर २४०७ |

येणे प्रमाणे चतु:सिमा पूर्वक प्लॉट मिळकत तदंगभुत वस्तुसह दरोबस्त, कॉलनी रोड सामाईकरित्या